# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ / फाल्गुन २३, १९४४ ( शके )**

**मुख्यमंत्री :- यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

---

**ठाणे येथील खाडीला रामसर दर्जा प्राप्त झालेला असताना खाडीतील प्रदूषणात वाढ होत असल्याबाबत**

**(१) * ५६७१३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे खाडीला नुकताच रामसर दर्जा मिळाल्याचे प्रमाणपत्र राज्य शासनाला मिळाले असतानाही खाडीतील प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खाडीमध्ये तीन डम्पिंग ग्राऊंडमधून सांडपाणी तसेच एमआयडीसीतील कारखान्यांतून रसायनमिश्रीत पाणी सोडले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कारखान्यांमधून सोडण्यात येणाऱ्या विषारी रसायनांमुळे माशांच्या पुनरुत्पादनावर मोठया प्रमाणात विपरित परिणाम होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रदुषणास आळा घालण्यासह संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, ठाणे – पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार ठाणे येथील खाडीत सोडण्यात येणाऱ्या रसायनमिश्रीत पाण्यामुळे खाडीतील माशांच्या पुनरुत्पादनावर परिणाम झाल्याची कोणतीही तक्रार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.
(४) नागरी घन कचरा (प्रक्रिया व विल्हेवाट) अधिनियम, २०१६ च्या अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मुंबई महानगरपालिकेस निर्देश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे शहरात विकासकामे आणि सुशोभिकरणाच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२) * ५७३६१ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात विकास कामे आणि सुशोभिकरणाची विविध माध्यमांतून कोट्यवधींची कामे करण्यात येत असून, उक्त कामे निकृष्ट दर्जाची व अपुर्णावस्थेत असतानाही संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांच्या संगनमताने कंत्राटदारांना देयकाची संपूर्ण रक्कम अदा करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संपूर्ण कामांची चौकशी करून संबंधीत अधिकारी व कंत्राटदारांविरोधात कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शहरातील अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरिता व संबंधीत दोषींविरोधात ठोस कारवाई करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) अशा आशयाची बातमी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली असून ठाणे शहरात सुरू असलेल्या विकास कामांची चौकशी करुन संबंधित अधिकारी व कंत्राटदारावर कार्यवाही करण्याबाबतचे निवेदन ठाणे महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार ठाणे शहरांतर्गत सुरू करण्यात आलेली विकास कामे निविदेतील विहित अटी व शर्तीनुसार योग्य गुणवत्ता राखुन पुर्ण झाल्यानंतरच सबंधित कंत्राटदाराचे देयके अदा करण्यात येतात.

सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीतील मुद्दयांची शहानिशा करण्याबाबत आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना सूचना देण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील विद्यार्थी स्वाधार योजनेपासून वंचित असल्याबाबत

**(३) * ५८१८३ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत आर्थिक मदत देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या जवळजवळ ५३३ विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मिळत नसल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ५३३ विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ तात्काळ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) नाही.

(३) बुलढाणा जिल्हयातील सन २०२०-२१ व २०२१-२२ मधील पात्र १०९४ अर्जापैकी डिसेंबर, २०२२ अखेर ५६१ विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. उर्वरित लाभार्थ्यापैकी ३५१ लाभार्थ्यांना माहे जानेवारी, २०२३ अखेर स्वाधार योजनेचा लाभ देण्यात आला असून शिल्लक राहीलेल्या १८२ लाभार्थ्यांना तरतूद प्राप्त होताच स्वाधार योजनेचा लाभ देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील १६५ केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान मिळण्याबाबत**

**(४) * ५७४८२ श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शाहू, फुले, आंबेडकर निवासी आश्रमशाळांना नियमित वेतनश्रेणीनुसार अनुदान देण्याच्या मागणीसाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत उपोषण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने सन २०१९ मध्ये १६५ पात्र आश्रमशाळांना २०% टक्के अनुदान देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करुन वेतनश्रेणी लागू करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत सन १९८८-१९९९ मध्ये स्वयंसेवी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठीच्या निवासी आणि अनिवासी प्राथमिक तसेच माध्यमिक शाळांसाठी सहाय्यक अनुदाने ही योजना सुरु करुन सन २००६ मध्ये राज्य शासनाकडे वर्ग करण्यात आलेल्या या शाळांना अनुदान लागू करण्याबाबत इत्यादी मागण्या शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार निवासी आश्रम शाळांना त्वरित अनुदान व वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) व (३) केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयामार्फत स्वयंसेवी संस्थाकडून चालविल्या जाणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींकरिता निवासी / अनिवासी प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळांना सहाय्यक अनुदाने ही योजना सन १९९८-९९ पासून सुरू करण्यात आलेली आहे. सदर योजनेंतर्गत राज्यातून केंद्रीय अनुदानासाठी एकूण ३२२ आश्रमशाळांचे प्रस्ताव केंद्र शासनास मंजूरीकरिता सादर करण्यात आले होते. त्यापैकी ३४ आश्रमशाळांना केंद्र शासनाने मानधन स्वरूपात अनुदान मंजूर केलेले आहे. उर्वरित २८८ आश्रमशाळांना केंद्र शासनाने अनुदान मंजूर न केल्यामुळे सदर आश्रमशाळांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर शाहू, फुले, आंबेडकर निवासी / अनिवासी शाळा योजना सुरू करून योजनेंतर्गत १६५ आश्रमशाळांना तपासणीच्या अधीन राहून सन २०१९-२० या वर्षापासून २०% प्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(४) शाहू, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी शाळा योजनेंतर्गत पात्र आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत शासन स्तरावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोराडी व खापरखेडा (जि.नागपूर) औष्णिक प्रकल्पातील राखेमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(५) * ५९९६० श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोराडी व खापरखेडा (जि.नागपूर) वीज केंद्राजवळच्या २१ गावांमध्ये फ्लाय ॲशमुळे जल व वायु प्रदुषित होऊन येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पातील जड व विषारी धातुंच्या घटकयुक्त राखेमुळे भूजल प्रदुषण देखील होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नांदगांव ॲशबंड या ठिकाणी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांनी माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या स्थळपाहणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील संस्थेच्या प्रतिनिधींसह संयुक्त पाहणी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व त्यानुषंगाने प्रदुषण रोखणे तसेच येथील नागरीकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) स्थानिक लोकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने मा.पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्री यांच्या १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी नांदगाव ॲश बंड ची पाहणी केली होती. त्याअनुषगाने मंडळाने पत्र दि.१५.०२.२०२२ अन्वये ॲश बंड मध्ये साठविण्यात आलेली राख पुर्णपणे उचलुन जमिन पुर्ववत करण्याबाबत निर्देश दिलेले होते. त्याच्या अनुपालनासाठी २० लक्ष रु. बॅक हमी घेण्यात आली होती. तसेच मुख्यालयाव्दारे पत्र दि.२५.०४.२०२२ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

कोराडी व खापरखेडा औष्णिक विदयुत केंद्रास मंडळाचे संमती पत्राच्या अटींचे उल्लंघन होत असल्याकारणाने आतापावेतो रु.९८.५० लक्ष रुपयाची बँक हमी जप्त करण्यात आली आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांच्या दि.२०.१२.२०२२ अहवालानूसार काही गावामध्ये शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यासाठी आर.ओ. प्लांन्ट आहेत व इतर गावामध्ये पिण्याच्या पाण्याचे क्लोरीनेशन करून शुध्द पाण्याचा पुरवठा ग्रामपंचायत मार्फत केला जातो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात मकर संक्रांतीच्या काळात पतंगाच्या नायलॉन मांज्यामुळे नागरिकांचा झालेला मृत्यु**

**(६) * ६२४१६ श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये मकर संक्रांतीच्या दरम्यान पंतग उडवितांना नायलॉन मांजा वापरल्यामुळे गळा चिरून अनेक लोकांचे मृत्यु व अपघात झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत नायलॉन मांजामुळे मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुंटुबियांना आर्थिक मदत मिळण्याची तरतूद करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नायलॉन मांजाबाबत एका जनहित याचिकेवर सुनावणी दरम्यान यामध्ये मृत्युमूखी पडलेल्यांना आर्थिक मदत मिळणेविषयीची तरतुद राज्य शासनाने शोधावी असे निर्देश मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, नायलॉन मांजा संदर्भातील समिती वर्षभरासाठी सक्रीय ठेवण्याची मागणी सामाजिक संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने नायलॉन मांजावर बंदी घालण्याची अधिसूचना काढण्याविषयी व पिडीतांना आर्थिक मदत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नायलॉन मांजाच्या वापरावर बंदी घालण्यात यावी या करिता माननीय उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने suo moto जनहित याचिका क्रमांक १/२०२१ दाखल केली आहे. सदर प्रकरणी दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजीच्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाने प्रतिवादी क्रमांक २ (जिल्हाधिकारी, नागपूर) यांना पुढीलप्रमाणे निर्देशित केले आहे.

"instruction also be obtained from the respondent No.2 as to whether any ad-hoc compensation could be made available to the parents of the unfortunate child who was the victim of injuries suffered due to use of nylon maanjha as per news report dated 16/01/2023."

(४) याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांच्या दिनांक ८ जानेवारी, २०२३ आदेशान्वये जिल्हा कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे.

(५) याबाबत शासन स्तरावरुन दिनांक ०१ मार्च, २०२३ रोजी अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उल्हासनगर कॅम्प नंबर ५ येथील (जि.ठाणे) अनधिकृत डंपिंग ग्राउंड स्थलांतरीत करण्याबाबत**

**(७) * ६०३९० श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर कॅम्प नंबर ५ येथील (जि.ठाणे) अनधिकृत डंपिंग ग्राऊंडमुळे दुर्गंधी पसरुन नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या वाढल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू डंपिंग ग्राऊंड स्थलांतरीत करण्याबाबत स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधींनी, समाज सेवक व पत्रकार यांनी विविध माध्यमातून आंदोलन, उपोषण व मागणी करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत डंपिंग ग्राऊंड तातडीने स्थलांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) उल्हासनगर कॅम्प नंबर ५ येथील डम्पिंग ग्राऊंडमुळे दुर्गंधी येत असून, आजाराचा सामना करावा लागत असणे व सदर डम्पिंग ग्राऊंड स्थलांतरीत करण्याबाबत स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी, समाजसेवक, पत्रकार यांनी मागणी केली आहे, हे खरे आहे.

सदर डम्पिंग ग्राऊंड व तेथील आजुबाजूच्या परिसरात नियमित जंतुनाशक व दुर्गंधीनाशक फवारणी करण्यात येत आहे व आठवड्यातून एकदा बायोकल्चर फवारणी करुन मशीनद्वारे घनकचरा सपाटीकरणाचे काम करण्यात येते. तसेच सदर ठिकाणच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांची दर तीन महिन्यांमध्ये वैद्यकीय तपासणी करण्यात येते, असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर डम्पिंग ग्राऊंड स्थलांतरीत करण्याच्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली / येत आहे:-

- मौजे उसाटणे, ता.अंबरनाथ येथील जागा घनकचरा व्यवस्थापन या सार्वजनिक प्रयोजनासाठी ताब्यात घेण्यात आली आहे. तथापि स्थानिक नागरिकांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्रमांक २३०९४/२०२१ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक २३.०३.२०२१ रोजी दिलेल्या आदेशान्वये पुढील निर्णय होईपर्यंत सदर प्रकल्पास स्थगिती दिली आहे.
- मौजे वालीवली, बदलापूर येथील ८.२ एकर जागेमध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंबरनाथ नगरपरिषद, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद आणि उल्हासनगर महानगरपालिका यांच्या एकात्मिक घनकचरा प्रकल्पाच्या निविदेची कार्यवाही सुरु असून, ती पूर्ण झाल्यानंतर प्रकल्प कार्यान्वित होणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्याबाबत

**(८) * ५६७०३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरास मोठ्या प्रमाणात चालना देण्यासाठी तसेच वायु प्रदूषणावर मात करण्यासाठी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान राज्याचे इलेक्ट्रिक वाहन धोरण जाहीर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरणपूरक म्हणून इलेक्ट्रिक वाहनांची खरेदी वाढावी म्हणून शासनाने काही सवलती देऊ केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय वापरासाठी इलेक्ट्रिक वाहने घेण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) दिनांक ०१.०१.२०२२ नंतर सर्व शासकीय, निम शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत व शासनाच्या निधीमधून खरेदी करण्यात येणारी वाहने बॅटरी इलेक्ट्रिक वाहने असावीत असा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जव्हार (जि.पालघर) नगरपरिषदेमार्फत विजयस्तंभ-देवाचे घर-भारती विद्यापीठ या जोडरस्त्याच्या कामात झालेली अनियमितता व गैरव्यवहार**

**(९) * ५७०९३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) नगरपरिषदेमार्फत करण्यात येणारे विजयस्तंभ-देवाचे घर-भारती विद्यापीठ या जोडरस्त्याच्या ४४.९८ लाख रुपयांच्या विकासकामात मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्याच्या कामात २० मि.ली. मीटर खडीचा किमान तीस टक्के वापर करणे अपेक्षित असताना, ठेकेदाराने संपूर्ण रस्त्याचे काम हातफोड दगडाच्या वापराने पूर्ण करुन व अत्यल्प प्रमाणात डांबराचा वापर करुन रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदार व अधिकारी यांचेविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) जव्हार नगरपरिषदेमार्फत विजयस्तंभ-देवाचे घर-भारती विद्यापीठ या जोडरस्त्याचे काम अंदाजपत्रकातील बाबनिहाय पूर्ण करण्यात आले आहे.

काम सुरु असतांना कामाच्या साहित्याचा चाचणी अहवाल (Quality Control Report) घेण्यात आलेला असून सदर अहवालामध्ये साहित्याच्या निकृष्टतेबाबत कोणताही मुद्दा नमूद करण्यात आलेला नाही.

तसेच काम पूर्ण झाल्यानंतर शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई यांचेमार्फत “त्रयस्थ तांत्रिक लेखा परिक्षण (Third Party Audit Report)” करुन घेतले असून सदर अहवालात कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचा दर्जा मानकाप्रमाणे असल्याचे नमूद असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अंबड (जि.जालना) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलींच्या शासकीय वसतिगृहातील गैरसोई दूर करण्याबाबत**

**(१०) * ६२१३५ श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबड (जि.जालना) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर या शासकीय मुलींच्या वसतिगृहातील मुलींना निकृष्ट दर्जाचे अन्न, पिण्यासाठी दूषित पाणी व आरोग्य सेवा दिली जात नसून गृहपाल श्रीमती किशोरी आलोने

यांचेकडून मुलींवर दबाव व वाईट वागणूक दिल्याप्रकरणी ४० ते ५० विद्यार्थीनींनी दिनांक ४ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास अंबड तहसील कार्यालयाच्या पायऱ्यावर ठिय्या आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहास अन्नपुरवठा वितरण करणारे श्री.अंबिरे व मुलीना वाईट वागणूक देणाऱ्या गृहपाल, श्रीमती आलोने तसेच मे. बहुजन हिताय व भोजन उत्पादक व पुरवठा मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था, परभणी यांचेविरुध्द फौजदारी कारवाई करण्याची मागणी सदर आंदोलक विद्यार्थिनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) होय.

(३) सबंधित मागासवर्गीय मुलींचे शासकिय वसतिगृह, अंबड, जि.जालना या वसतिगृहाचे गृहपाल श्रीम.आलोने यांना समाज कल्याण आयुक्तालयाचे दि.९.२.२०२३ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन कार्यालय, जालना यांनी पोलीस स्टेशन, अंबड येथे मुदतबाहय बिस्कीट पुरवठा केल्याप्रकरणी मे.बहुजन हिताय व भोजन उत्पादक व पुरवठा मागासवर्गीय सह. संस्था, जि.परभणी यांचेविरूध्द गु.र.नं.८३/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच, सबंधित भोजन पुरवठादारांचा जालना जिल्हयातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह, जालना, संत रामदास मुलांचे शासकीय वसतिगृह, जालना आणि मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, जालना या वसतिगृहांचा भोजन पुरवठा रद्द करण्यात आला असून तो इतर पुरवठादारास देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) शहरातून वाहणाऱ्या चंद्रभागा नदीच्या प्रदूषणामध्ये वाढ झाल्याबाबत

**(११) * ५७२३२ श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) शहरातून वाहणाऱ्या चंद्रभागा नदीमध्ये प्रदूषण व घाणीचे साम्राज्य पसरल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदीपात्रातील पाणी अस्वच्छ असल्यामुळे भाविकांना स्नान करण्यास धोकादायक असल्याचा अहवाल संबंधित विभागाने पालिका प्रशासनाला दोन वर्षापूर्वीच दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार स्थानिक प्रशासनाकडे पाठपुरावा करून देखील संबंधित प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यामुळे दिवसेंदिवस प्रदूषणात मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चंद्रभागा नदीत होणारे प्रदूषण रोखण्यासाठी श्री. विजय भाटकर यांच्या नेतृत्वाखाली हाती घेण्यात आलेला नवीन जलशुध्दीकरण प्रकल्प आतापर्यंत कोणकोणत्या ग्रामपंचायतीमध्ये कार्यान्वित करण्यात आला आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नदीचे होणारे जलप्रदूषण थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, "वारकऱ्यांच्या चंद्रभागेत घाणीचे साम्राज्य" या सदराखाली स्थानिक वर्तमानपत्रामध्ये दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी बातमी प्रसिद्ध झाल्याचे दिसून येते.
(२) चंद्रभागा नदी प्रदुषणाबाबत तसेच नदीपात्रातील पाणी अस्वच्छ असल्याबाबत कोणताही अहवाल पंढरपूर नगरपरिषद प्रशासनाकडे प्राप्त झालेला नाही, असे प्रशासनाने कळविले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) अशा स्वरुपाचा कोणताही जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आलेला नाही, असे जिल्हा परिषद सोलापूर प्रशासनाने कळविले आहे.
(५) पंढरपूर शहरातून वाहणाऱ्या चंद्रभागा नदीच्या प्रदुषणाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या अहवालानुसार, राष्ट्रीय जल गुणवत्ता तपासणी कार्यक्रम अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील भिमा नदीवर एकूण ४ ठिकाणी दरमहा नदीच्या पाण्याचे नमूने गोळा करुन त्याची गुणवत्ता तपासण्यात येते. त्यानुसार मागील वर्षाच्या आकडेवरुन प्रदुषणाच्या पातळीत वाढ झाल्याचे दिसून येत नाही.

नदी प्रुदषणास कारणीभूत घटकांपैकी घरगुती सांडपाणी हे कारण असून पंढरपूर नगरपरिषदेकडे २०१४ पासून १५.५ MLD क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया केंद्र कार्यान्वित आहे. तसेच सन २०१९ पासून २.५MLD क्षमतेचा प्रकल्प कार्यान्वित आहे.

या व्यतिरिक्त पंढरपूर शहराची तरंगती लोकसंख्या विचारात घेता, चंद्रभागा नदीत सांडपाणी मिसळू नये म्हणून नगरपरिषदेकडून चंद्रभागा नदीपात्रात समांतर २.७ कि.मी. लांबीची भुयारी गटार पाईपलाईन टाकण्यात आली आहे. तसेच ७.२ MLD क्षमतेचा पंपहाऊस बांधण्यात आलेला आहे. त्यामुळे चंद्रभागा नदीपात्रात नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये प्रदुषण होत नाही.

या व्यतिरिक्त पंढरपूर नगरपरिषदेने भुयारी गटार योजना टप्पा क्रमांक ४ मध्ये ५ MLD क्षमतेचे २ मलशुद्धीकरण प्रक्रिया केंद्र, ३ पंपिंग स्टेशन इत्यादी प्रस्तावित केले असून त्यांची तांत्रिक तपासणी करण्यात येत आहे.

पंढरपूर शहराच्या अगोदर अकलूज व काही इतर गावे असून सदर गावाचे घरगुती सांडपाणी प्रक्रिया न करता भिमानदीमध्ये मिसळत असल्याचे दिसून येत असून त्याचा एकत्रित परिणाम भिमा नदीच्या पाण्याच्या गुणवत्तेवर झाला आहे. दरम्यान सदर पट्ट्यामध्ये प्रदुषण रोखण्याकरीता नमामि चंद्रभागा योजनेंतर्गत घरगुती सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभे करण्याचे प्रस्तावित आहे. याबाबतची निविदा प्रसिद्ध करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद सोलापूर यांच्याकडून करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषदेतील घनकचरा व्यवस्थापनाबाबत

**(१२) * ५७६४५ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापन ठेकेदार श्री.नितीन देवराम बनसोड (सुबेअ) यांच्या नोंदणी प्रमाणपत्रानुसार ५० लाख रुपयांची कामे घेण्याची क्षमता असताना झोन नं.९ करीता रक्कम रुपये ७१,९९,४२३/- रुपयांचा ठेका देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाकरीता दुसरे ठेकेदार पांचाळ मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. यांना केवळ १५ लाख रुपये पर्यंतची कामे घेण्याची पात्रता असताना एकूण ४ झोनकरीता सुमारे रुपये २,८३,८४,९२९/- ठेका देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच तिसरा ठेकेदार दुर्गा कन्स्ट्रक्शन ट्रान्सपोर्ट सर्विसेस यांची कामगार पुरविण्याची क्षमता संख्या ५ असताना झोन ४ मध्ये एकूण १०३ कामगार पुरविण्याचा ठेका दिल्याचे सन २०१७-१८ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये नमूद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित ठेकेदारांसह पालिकेतील अधिकारी व संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच तिन्ही ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याबाबत पालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या १० झोनमधील घनकचऱ्याचे संकलन आणि वाहतुक करणे याकामी स्विकारलेल्या निविदांपैकी दोन निविदाधारकांकडे कार्य पार पाडण्याची क्षमता नव्हती, तर तिसऱ्या निविदाधारकाकडे आर्थिक क्षमता, कंत्राटदार परवाना, वैध कामगार परवाना नव्हता. असे असतांना संबंधितास कंत्राट दिले असल्याचे आक्षेप दि.३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षाच्या "वार्षिक तांत्रिक निरीक्षण अहवाल (स्थानिक संस्था)" यामध्ये नोंदविलेले आहेत, हे खरे आहे.
(४) सदर आक्षेपांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांना चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांचा प्राथमिक चौकशी अहवाल प्राप्त झाला असून त्यावर प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नॅशनल पार्क (नारा पार्क) साठी आरक्षित जागेची विक्री केल्याबाबत

**(१३)** * **६०५०८ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर (उत्तर) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नॅशनल पार्कसाठी (नारापार्क) ५२.१३ हेक्टर (१३० एकर) जमीन आरक्षित असून तेथे नागपूर सुधार प्रन्यास उद्यान विकसित करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनीवर उद्यान विकसित करण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यासने अद्याप जमिनीचा ताबा घेतलेला नसून दरम्यान विकासकांनी त्यापैकी ३६ एकर जमीन सुमारे २६ कोटी रुपयांत खरेदी केली असल्याचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार विकासक तसेच संबंधित दोषी अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) शासनाने दि.१०.०९.२००१ रोजी मंजूर केलेल्या सुधारीत विकास योजनेनुसार खसरा क्र. १६१, १६२ (भाग), १६३ (भाग), १६४ ते १७५, २०२, २०३, २११, २१२, २१३ मौजा-नारा, क्षेत्र ५२.६३ हे. जागा पार्क (एन-१६६) या आरक्षणाकरीता प्रस्तावित आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सदर जमिनीवर उद्यान विकसित करण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यासने अद्याप जमिनीचा ताबा घेतलेला नाही. सदर जागा अद्याप खाजगी मालकीची असून सदर ५२.६३ हेक्टर पैकी १०.१२ हे. आर. जागा रु.३२.५० कोटी इतक्या किंमतीस विक्री झाल्याचे सह दुय्यम निबंधक वर्ग-२ नागपूर शहर क्रमांक १ यांच्या दि.२८.०२.२०२३ च्या पत्रावरुन निदर्शनास येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातील पेठ रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१४) * ५९८०४ ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील पेठ रस्त्याची हनुमान चौक ते राहू हॉटेल ते महानगरपालिका हद्दीपर्यंत रस्त्याची दुरवस्था झाली असून सुमारे ४.५ कि.मी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून अपघाताचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ७ डिसेंबर, २०१९, दिनांक १९ ऑगस्ट, २०२०, दिनांक २१ जून, २०२२ व २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या पत्राव्दारे आयुक्त महानगरपालिका, नाशिक व जिल्हाधिकारी, नाशिक व प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे रस्ता दुरुस्तीबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील रस्त्याच्या दूरवस्थेच्या विरोधात स्थानिक नागरिकांनी दिनांक २२ नोव्हेंबर २०२२, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ व माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मोठे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील रस्त्याच्या दुरुस्तीसाठी एकूण रु.७२ कोटी रुपये खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले असता आयुक्त, महानगरपालिका नाशिक यांनी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने सदरील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत असमर्थता दर्शविल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरील पेठ रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत अद्यापपर्यंत नगर विकास विभाग, नाशिक महानगरपालिका व जिल्हाधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाशिक शहरातील पेठरोड हा अत्यंत वर्दळीचा मार्ग आहे. या रस्त्यावर शहरातील महत्वाची ठिकाणे असल्यामुळे या रस्त्यावरील वाहतुकीची घनता दिवसेंदिवस वाढत आहे.

सदर रस्त्यावर अनेक छोटे छोटे खड्डे निर्माण झाल्यामुळे वाहतुकीचा वेग मोठ्या प्रमाणात मंदावलेला आहे. त्यामुळे मोठे अपघाताचे प्रमाण नगण्य आहे. तथापि, दुचाकी वाहने स्लिप होऊन किरकोळ स्वरुपांच्या अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे.

(२), (३), (४) व (५) सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी पेठरोड येथील रहिवाशी नागरिकांनी अनेकवेळा आंदोलने/रास्ता रोको केला आहे.

- त्यामुळे तातडीची उपाययोजना म्हणुन सदर रस्ता वाहतुक योग्य व्हावा या दृष्टीने रस्त्याच्या डागडुजीचे काम महानगरपालिकेने सुरु केले आहे.
- सदर रस्ता नव्याने बांधण्याशिवाय पर्याय नसल्यामुळे नाशिक महानगरपालिका हद्द ते कृषी उत्पन्न बाजार समिती पर्यंत काँक्रीट रस्ता तयार करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.
- सदर ७ कि.मी. लांबीचा रस्ता तयार करण्यासाठी सुमारे रु.८५ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.
- सदर कामासाठी जिल्हा नियोजन आराखड्यातून त्यावेळच्या दरपत्रकानुसार सुमारे रु.७ कोटी निधी देणेबाबत महानगरपालिकेमार्फत दि.२२/०९/२०२२ रोजी कळविण्यात आले आहे.
- नाशिक महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखड्यानुसार सदर रस्त्याची रुंदी ३० मीटर आहे.
- आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने सदरचा रस्ता अत्यंत महत्वपुर्ण असून, पुर्ण रुंदीचा रस्ता विकसनासाठी सुमारे १५० कोटी एवढा खर्च अपेक्षित असल्याचे, नाशिक महानगरपालिकेने कळविले आहे.
- सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निधी मिळविण्याबाबत महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी नगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनेतंर्गत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१५) * ५७८८३ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी नगरपालिकेकडून पाणी पुरवठा योजनेसाठी मालकीची जागा नसतांना १३० कोटी रुपयांची कामे करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नुकसानीची जबाबदारी निश्चित करुन योजनेच्या विलंबास जबाबदार तसेच शासनास खोटी माहिती देऊन फसवणूक केल्यामुळे झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराप्रकरणी प्रादेशिक चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे,

केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अभियांनातर्गत परभणी शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दि.०४.०५.२००७ च्या SLSC च्या बैठकीमध्ये रु.१०४.४८ कोटी रक्कमेच्या प्रकल्पास शासन मान्यता देण्यात आली होती.

(२) व (३) परभणी शहराच्या पाणी पुरवठा योजनेच्या कामातील अनियमिततेच्या अनुषंगाने, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द दोषारोपपत्रे बजाविण्यात आली असून, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी

प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांची चौकशी अधिकारी म्हणून दि.०६.१२.२०२२ रोजीच्या शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. चौकशी अधिकारी यांच्या स्तरावर सदर विभागीय चौकशी प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजा दहेगाव (गोंडी), (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील कालव्याकरिता संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(१६)** * **६०८२२ श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा दहेगाव (गोंडी) (ता.आर्वी, जि.वर्धा) येथे लघुसिंचन पाटबंधारे विभागामार्फत खापरी तलावाची निर्मिती केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खापरी तलावाचे पाणी शेतकऱ्यांना कालव्याद्वारे देण्याकरिता ३० ते ३२ शेतकऱ्यांच्या जमीनी संपादित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खापरी तलावाच्या कालव्याकरिता ज्या शेतकऱ्यांच्या शेतीमधून कालव्याचे बांधकाम करण्यात आले आहे त्या शेतकऱ्यांना अद्याप जमीनीचा मोबदला दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला तात्काळ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत काय ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), व (३) होय, हे खरे आहे.
(४) सदर योजनेकरिता भूसंपादन कायदा-२०१३ नुसार खाजगी वाटाघाटीने जमीन खरेदी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, वर्धा यांनी सन २०१६ मध्ये मूल्यांकन करुन त्यास जिल्हा समितीची मंजूरी प्राप्त आहे. त्यानुषंगाने सदर योजनेकरीता संपादित जमिनीचा मोबदला अदा करण्यासाठी रु.३००.४३ लक्ष निधी आवश्यक आहे. तथापि, योजनेवरील आतापर्यंत झालेला खर्च विचारात घेता, भूसंपादन निधी अदा करण्याची योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे. योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातील मायको सर्कल व त्रिमूर्ती चौक येथील उड्डाणपूल रद्द करण्याबाबत

**(१७)** * **५६७१७ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अजित पवार (बारामती), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील मायको सर्कल व त्रिमूर्ती चौक येथे उड्डाणपुलाची आवश्यकता नसतानाही २५० कोटी रुपयांच्या कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खराब असतांनाही अंदाजपत्रकामध्ये किरकोळ तरतूद दाखवून बेकायदेशीरपणे दिलेले कार्यारंभ आदेश महानगरपालिका आयुक्त यांनी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये रद्द करण्याचे आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी उड्डाणपूल उभारण्यापूर्वी आवश्यक असलेले वाहतूक सर्वेक्षण न करता हे प्रकल्प मंजूर करून सिमेंटच्या दर्जाची प्रतवारी वाढविण्याच्या उद्देशाने अंदाजपत्रकामध्ये परस्पर ४४ कोटी रुपयांची वाढ केल्यामुळे या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी आयआयटी पवई यांनी त्रिमूर्ती चौक व मायको सर्कल येथे उड्डाणपुलाची गरज नसल्याचा अहवाल दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनावश्यक उड्डाणपूल रद्द करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाशिक शहरातील मायको सर्कल व त्रिमुर्ती चौक येथे वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढल्याने व या मार्गावर वारंवार वाहतुक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आल्याने, या ठिकाणी उड्डाणपुल बांधण्याबाबत महानगरपालिकेच्या लोकप्रतिनिधींची आग्रही मागणी होती.

त्याअनुषंगाने, महासभा ठराव क्र.१, दि.२९/०५/२०२० व ठराव क्र.३४०, दि.२०/१०/२०२० अन्वये केलेल्या आर्थिक तरतूदीनुसार सदर कामांचे प्राकलन तयार करुन, निविदा मागवुन, स्थायी समिती ठराव क्र.६८० व ६८१, दि.१७/०२/२०२१ अन्वये वित्तीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर, महानगरपालिकेमार्फत मक्तेदार यांचेसमवेत करारनामा करुन सदर उड्डाणपुलाच्या कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

(२) मायको सर्कल व त्रिमुर्ती चौक येथील उड्डाणपुलाची निविदा रक्कम अनुक्रमे रु.१२५.९५ कोटी व रु.१२०.९२ कोटी इतकी आहे. सदर कामांकरीता सन २०२१-२२ च्या महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात अनुक्रमे रु.०२.०० कोटी व रु.०३.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली असून, सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात अनुक्रमे रु.०८.४४ कोटी व रु.०९.९७ कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

मायको सर्कल येथील उड्डाणपुलाबाबत आय.आय.टी., पवई यांच्या तपासणी अहवालानुसार पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. तसेच, त्रिमुर्ती चौक येथील उड्डाणपुलाचे बांधकाम अद्यापपर्यंत सुरु केलेले नसल्याने संबंधित मक्तेदार यांना महानगरपालिकेमार्फत नोटीस देण्यात आली असून, निविदा अटीशर्तीनुसार पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) व (४) नाशिक शहरात निओ मेट्रोच्या होणाऱ्या प्रकल्पामुळे वाहतुकीत होणारा संभावित बदल, तसेच तत्कालिन पालकमंत्री यांनी दि.२५/०४/२०२२ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीत उड्डाणपुलाची आवश्यकता तपासणीबाबत प्रदर्शित केलेले मत, तसेच या कामांमध्ये ५४० वृक्ष तोडावे लागणार असल्याने वृक्षप्रेमींचा होणारा विरोध, या कारणांमुळे या उड्डाणपुलांची आवश्यकता आहे किंवा कसे, याबाबतची तपासणी आय.आय.टी., पवई यांचेमार्फत करण्याचे निश्चित करण्यात आले होते.

त्यानुसार, मायको सर्कल उड्डाणपुलाबाबत आय.आय.टी., पवई यांचा अहवाल प्राप्त असून, या उड्डाणपुलाचे बांधकाम केल्याने सन २०३० पर्यंत लेव्हल ऑफ सर्व्हीस मध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होत नसल्याचे त्यांनी कळविलेले आहे.

तथापि, त्रिमुर्ती चौक येथील उड्डाणपुलाबाबत आय.आय.टी., पवई यांनी अभ्यास केलेला नाही. तसेच, सदर उड्डाणपुलाचे बांधकाम अद्यापपर्यंत सुरु केले नसल्याने महानगरपालिकेमार्फत संबंधित मक्तेदार यांना नोटीस देण्यात आली असून, निविदा अटीशर्तीनुसार पुढील कार्यवाही प्रगतीत आहे, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर उड्डाणपुलाच्या कामामध्ये प्राकलनात सेगमेंटल प्रिकास्ट कॉंक्रीट करीता M-४५ ग्रेड कॉंक्रीटची तरतुद करण्यात आली होती. तथापि, महासभा ठराव क्र.१०१०, दि.२०/०९/२०२१, ठराव क्र.१२७० व १२७१, दि.१७/१२/२०२१ व स्थायी समिती ठराव क्र.७२७ व ७२८, दि.२३/१२/२०२१ च्या मान्यतेने सेगमेंटल प्रिकास्ट कॉंक्रीट M-४५ ग्रेड ऐवजी M-६० ग्रेड कॉंक्रीट मंजुर करण्यात आले आहे. यास मक्तेदार यांनी सहमती दर्शविलेली असल्याने, मंजुर निविदा रक्कमेत कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कराड (जि.सातारा) परिसरातील मैलामिश्रित सांडपाणी कृष्णा व कोयना नदीच्या पात्रात सोडले जात असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(१८) * ६२५०८ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) परिसरातील दहापेक्षा जास्त ठिकाणावरुन मैलामिश्रित सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता कृष्णा व कोयना नदीच्या पात्रात सोडले जात असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सांडपाणी उक्त दोन्ही नदयांमध्ये सोडण्यात येत असताना या प्रकरणी प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रदूषण रोखण्याबाबत तसेच संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

याबाबत स्थानिक प्रशासनाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) कराड परिसरात कृष्णा-कोयना नदीच्या काठी असलेली गावे ग्रामपंचायत कापील, ग्रामपंचायत कार्वे, ग्रामपंचायत साजूर, ग्रामपंचायत शेरे, ग्रामपंचायत खुबी, ग्रामपंचायत सैदापूर, ग्रामपंचायत गोंदी, ग्रामपंचायत केसे, ग्रामपंचायत रेठरे बु., ग्रामपंचायत मालखेड, ग्रामपंचायत तांबवे, ग्रामपंचायत रेठरे खुर्द, ग्रामपंचायत कोडोली, ग्रामपंचायत कोरेगांव, ग्रामपंचायत दुशेरे यांनी लेखी कळविल्यानुसार त्यांच्या गावातील मैला मिश्रित पाणी कृष्णा-कोयना नदीपात्रात सोडले जात नाही.

कराड शहर हे कृष्णा-कोयना नदीच्या संगमावर वसलेले शहर असून कराड नगरपरिषदेकडे १२.५ MLD क्षमतेचा सांडपाणी पुनर्प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित आहे. सदर प्रकल्पातून प्रक्रिया केलेले पाणी शेतीला वापरण्यासाठी दिले जाते. कराड नगरपरिषदेचे कोणतेही सांडपाणी कृष्णा कोयना नदीपात्रात सोडले जात नाही, असा नगरपरिषदेने अहवाल दिला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ध्रुवनगर शिवारात (गंगापूर, जि.नाशिक) बांधकाम सुरु असलेल्या इमारतीच्या लिफ्टच्या खड्यात पडून झालेला मृत्यु

**(१९) * ६२२३३ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ध्रुवनगर शिवारात (गंगापूर, जि.नाशिक) बांधकाम सुरु असलेल्या इमारतीच्या लिफ्टकरीता खोदलेल्या खड्यात पडून दहा वर्षाच्या बालकाचा मृत्यु झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२३ वा त्यादरम्यान घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची घटना ही बांधकाम व्यावसायिकाने सुरक्षाविषयक उपाययोजना न केल्याने घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने बांधकाम परवानगी देताना सुरक्षा विषयक उपाययोजना संबंधित बांधकाम व्यावसायिकाकडून दिल्या जातात किंवा नाही याची खातरजमा केलेली नसल्याचे चौकशी दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने सुरक्षा विषयक उपाययोजना करण्याबाबत तसेच बांधकाम व्यावसायिक व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

सदरची अपघाती दुर्घटना दि.२६/०१/२०२३ रोजी घडलेली आहे.

(२), (३) व (४) नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे गंगापुर शिवारातील स.नं.९१/२ मधील भूखंड क्र.१+२+२०+२१ यावर महानगरपालिकेने दि.१६/०९/२०२१ अन्वये इमारत बांधकामाची परवानगी दिलेली आहे.

- खाजगी भूखंडावरील इमारत बांधकाम परवानगी ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ६९ अन्वये अटी शर्तींना अधिन राहून देण्यात आली होती.
- सदर अटींपैकी अट क्र.१४, २६, २७, ३० व ३१ या इमारत निर्माणकार्य करत असतांना विकासकाने कराव्या लागणाऱ्या सुरक्षा विषयक उपाययोजना व त्याअनुषंगाने घ्यावी लागणारी खबरदारी यासंबंधित आहेत.
- सदर अटींचे काटेकोरपणे पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी विकासकांवर बंधनकारक असते.
- या अटींचे उल्लंघन केल्यास संबंधित विकासक कायदेशीर कारवाईस पात्र असतो.
- सदर भूखंडामध्ये ८०% बांधकाम पुर्ण झालेले असून, भूखंडाच्या हद्दीत पत्र्याचे कुंपण केलेले आहे. तसेच वॉचमन व सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यात आलेला आहे. तथापि, तळ मजल्यावर लिफ्ट पिटला संरक्षक भिंत आढळून आली नव्हती.
- याअनुषंगाने, महानगरपालिकेने संबंधित विकासकास दि.२२/०२/२०२३ अन्वये नोटीस देऊन इमारत बांधकाम परवानगी रद्द का करु नये, याबाबत खुलासा मागविण्यात आलेला आहे.
- तसेच उक्त प्रकरणी सदर बांधकाम व्यावसायिक यांच्यावर दि.२८/०१/२०२३ रोजी गंगापूर पोलीस ठाणे येथे स्टे.डायरी नोंद क्र.३२/२०२३ अन्वये भा.दं.वि. कलम ३०४(अ) अन्वये एफ.आय.आर. दाखल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परळ (मुंबई) येथील 'केईएम' रुग्णालयातील महिला वसतीगृहाची झालेली दुरवस्था

**(२०) * ६०१६५ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परळ येथील 'केईएम' रुग्णालयातील ३०० शिकाऊ परिचारिका व ३० परिचारिका शिक्षिका राहत असलेल्या महिला वसतीगृहाचा स्लॅब कोसळून महिला गंभीर जखमी झाल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतीगृहात लॅब कोसळण्याच्या घटना वारंवार घडत असून वसतीगृहातील महिला कर्मचारी जीव मुठीत घेऊन तेथे वास्तव्य करीत असल्याने, वसतीगृह इमारतीचे 'स्ट्रक्चरल ऑडिट' करण्यात आले असता इमारत 'सी-२' श्रेणीत असल्याचा अहवाल दिल्यानंतर सदरहू वसाहत धोकादायक झाल्याने रिक्त करुन टी.बी.रुग्णालय, शिवडी येथे स्थलांतरीत करण्याचा प्रशासनाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासनाने घेतलेल्या निर्णयास परिचारिकांनी हरकत घेतल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे दुसऱ्या ठिकाणी पर्यायी जागा देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने महानगरपालिकेने अथवा शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) दिनांक ०३.११.२०२२ रोजी के.ई.एम. रुग्णालयाच्या परिचारीका वसतीगृहाच्या खानावळीतील स्लॅबचे प्लास्टर पडून त्यात खानावळ चालविणाऱ्या कंत्राटदाराकडे काम करणारी महिला कर्मचारी किरकोळ जखमी झाली होती. सदर महिलेवर तात्काळ उपचार करुन तिला त्वरीत घरी पाठविण्यात आले, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) परिचारीका वसतीगृह इमारतीचे सद्य:स्थितीत संरचनात्मक परिक्षण करण्यात आले असून, सदर इमारत "सी-२ए" श्रेणीत असल्यामुळे सदर इमारत रिक्त करुन दुरुस्त होईपर्यंत तेथील परिचारीकांना जवळच्या शिवडी क्षयरोग रुग्णालयामध्ये स्थलांतरीत करण्याचे प्रस्तावित होते. तथापि, तेथे राहणाऱ्या विद्यार्थीनी, परिचारीका व इतरांनी शिवडी क्षयरोग रुग्णालयात स्थलांतरीत होण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांना जवळच्या महानगरपालिकेच्या शाळेमध्ये स्थलांतरीत करण्याचे प्रस्तावित आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घुग्घुस (जि.चंद्रपूर) परिसरातील लॉयड स्टिल कंपनीकडून होत असलेल्या प्रदुषणास आळा घालण्याबाबत

**(२१) * ६२११० श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घुग्घुस (जि.चंद्रपूर) या परिसरातील लॉयड स्टिल कंपनीकडून प्रदुषण होत असून या प्रदुषणामूळे परिसरातील पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असून शेकडो नागरिकांच्या आरोग्यावरही त्याचा परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदुषणामूळे पिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्याबाबत कंपनीचे अधिकारी, जिल्हाधिकारी चंद्रपूर व कृषी अधिकारी यांची जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त प्रदुषणाबाबतची चौकशी निरी या संस्थेमार्फत करण्यात येऊन त्याचा चौकशी अहवाल महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे सदस्य सचिव यांच्याकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास माहे जानेवारी-२०२३ मध्ये सदर उद्योगाच्या प्रदूषणामुळे परिसरातील पिकांचे नूकसान व नागरीकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम झाल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.

उद्योगाच्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरीकांच्या आरोग्यावर विपरीत परिणामाबाबतचा सविस्तर अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडून दि. २२/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आल्यानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडून दि. २७/०२/२०२३ रोजीच्या प्राप्त अहवालानूसार माहे एप्रिल-२०२२ ते जानेवारी-२०२३ दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र, घुग्घूस येथील दैनंदिन येणाऱ्या रूग्णांची आकडेवारी दर्शविलेली असून सदर आकडेवारी वरून विविध आजाराच्या प्रमाणात वाढ झाल्याचे निश्चित सांगता येणार नाही असे नमूद केलेले आहे.

जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालयाकडून प्राप्त अहवाल दि. २८.०२.२०२३ नुसार प्रदूषणामुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत एकरी ५० हजार रूपये नुकसान भरपाई देण्याबाबत कंपनीचे अधिकारी, जिल्हाधिकारी चंद्रपूर व कृषी अधिकारी यांची जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगाची वेळोवळी पाहणी करण्यात येते व पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने उद्योगावर कार्यवाही करण्यात येते. मे. लॉईड मेटल्स् अँड एनर्जी लि. या कारखान्यास संमतीपत्रातील अटी व शर्तींची पूर्तता न केल्यामुळे दि. ०४.०८.२०२२ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. तसेच दि. १३.०९.२०२२ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रांजणगाव (जि.पुणे) येथील मे.महाराष्ट्र एन्व्हॉयरो पॉवर कंपनीतील रसायनयुक्त पाण्यावर प्रक्रिया करुन जलप्रदूषणाला आळा घालण्याबाबत

**(२२) * ६१५५६ श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रांजणगाव (जि.पुणे) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील मे. महाराष्ट्र एन्व्हॉयरो पॉवर कंपनी मधून रसायनयुक्त पाण्यावर कोणतीही आवश्यक ती प्रक्रिया न करता ते नाल्यांद्वारे थेट निमगाव भोगी येथील तलावात सोडण्यात येत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाप्रकारे नियमबाह्यरित्या रसायनयुक्त पाणी सोडणाऱ्या कंपन्यांविरुध्द तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रसायनयुक्त पाण्यावर प्रक्रिया करणे अनिवार्य करुन जलप्रदुषणाला आळा घालण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) प्रश्नाधीन प्रकल्पामधून होत असलेल्या प्रदूषणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त तक्रारीस अनुसरुन केलेल्या पाहणीदरम्यान प्रश्नाधीन प्रकल्प हा सखल भागामध्ये असल्यामुळे प्रकल्पामधून निचरा झालेले पाणी संरक्षण भिंतीमधून निमगांव भोगी पाझर तलावाच्या बाजूला झिरपत असल्याचे निदर्शनास आले होते.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार रांजणगाव (जि.पुणे) कार्यक्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जलजन्य व साथस्वरुपाचे रुग्ण आढळून आलेले नाहीत.
(२) व (३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या पाहणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटीनुसार मे.महाराष्ट्र एन्व्हॉयरो पॉवर लि. व मे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना प्रस्तावित व अंतरिम निर्देश बजाविण्यात आले आहेत. तसेच संबंधित उद्योगाकडून रु. ५/- लाख इतक्या रकमेची बँक हमी जप्त करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील जीन्स कारखान्यांद्वारे होणाऱ्या प्रदूषणाला आळा घालण्याबाबत

**(२३) * ६१०७८ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील प्रदूषणास कारणीभूत ठरलेले जीन्सचे कारखाने महानगरपालिकेने बंद केल्यानंतर या कारखानदारांनी अंबरनाथ नजीकच्या मलंगगड भागातील ना-हेण, करवले या ग्रामपंचायत हद्दीत प्रदूषण मंडळ, ग्रामपंचायतीच्या हद्दीत विनापरवानगी कारखाने सुरू केले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबरनाथ नजीकच्या ग्रामीण भागात ५० हून अधिक जीन्स कारखान्यातून निघणारे रसायनमिश्रीत प्रदूषित पाण्यामुळे ग्रामीण भागात पाणी, जल व वायू प्रदूषणाची गंभीर समस्या निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रसायनमिश्रीत प्रदूषित पाण्यामुळे सुपिक जमिनी नापिक होत असून शेती धोक्यात आल्याचे व गावातील बोअरवेलचे पाणी प्रदूषित झाले असून येथील ग्रामस्थांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण होत असल्याने सदरहू कारखान्यांना प्रतिबंध घालण्यात यावा अशी मागणी प्रादेशिक प्रदूषण नियंत्रण महामंडळ, तहसिलदार, अंबरनाथ, जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे सातत्याने लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मागील वर्षी मलंगगडच्या नदीत झालेल्या प्रदूषणानंतर अंबरनाथ तहसिलदारांनी या कारखान्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्याचे आदेश स्थानिक महावितरण कंपनीला दिल्यानंतरही महावितरणने केवळ पाच कारखान्यांवर कारवाई केली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या संदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) प्रश्नाधिन विषयाच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्याकडे दिलेली तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्नाधिन विषयाच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्याकडे दिलेली तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त तक्रारीस अनुसरुन केलेल्या पाहणीदरम्यान मौजे चिंचपाडा, द्वारली आणि पवार सेक्शन येथे एकूण १८ जीन्स वॉशिंग उद्योग विनापरवाना कार्यरत असल्याचे आढळून आले होते. सदर, जीन्स वॉशिंग उद्योगामधून निर्माण होणारे सांडपाणी विनाप्रक्रिया उद्योगाबाहेर सोडत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर जीन्स वॉश उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योग बंदचे आदेश बजावण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वालधुनी नदीमध्ये (उल्हासनगर, जि.ठाणे) रसायनयुक्त घटक सोडल्याने प्रदुषणात वाढ होत असल्याबाबत

**(२४) * ६०३९५ श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातून वाहणाऱ्या वालधुनी नदीमध्ये मोठ्या प्रमाणात रसायनमिश्रित पाणी सोडल्याने उल्हासनगर आणि अंबरनाथ शहरातील नागरिकांना वायू व जल प्रदूषणाचा त्रास होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंबरनाथमधील अतिरिक्त आनंदनगर एमआयडीसी, कल्याण-बदलापूर मार्गालगतची वडोल आणि मोरीवली एमआयडीसी येथील बेजबाबदार कंपन्यांमुळे अंबरनाथ शहरातील वालधुनी नदी तसेच रासायनिक कंपन्यांलगत वाहणारे बारमाही नाले प्रदूषित होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंबरनाथ, उल्हासनगर शहरातून वाहणाऱ्या वालधुनी नदीत मोठ्या प्रमाणात फेसाचे थर साचल्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने आनंदनगर एमआयडीसीतील कंपन्यांना माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान "कारणे दाखवा" नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उक्त कंपनीला वीज व पाणी पुरवठा खंडीत करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन होणारे प्रदुषण रोखण्याबाबत तसेच संबंधित कंपन्या व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

(४), (५) व (६) वालधुनी नदीमध्ये फेस तयार झाल्याबाबतचे वृत्त दिनांक २०/१२/२०२२ रोजी प्रसिध्द झाले होते. त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान दोषी आढळून आलेल्या मे. साई फर्टीलायझर व फॉस्फेट्स प्रा.लि. या उद्योगास दिनांक २२/१२/२०२२ रोजी प्रस्तावित निर्देश व दिनांक २७/०२/२०२३ रोजी अंतरिम आदेश बजावून सदर उद्योगाची रु. १ लाख इतक्या रकमेची बँक हमी जप्त करण्यात आली आहे.

-----------------

**येलदरी आणि सिध्देश्वर धरणाच्या (जि.परभणी) उभारणीसाठी पुनर्वसित झालेल्या गावांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२५)** * **५७९२२ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील येलदरी आणि सिध्देश्वर या धरणाच्या उभारणीसाठी परिसरातील ३८ गावांचे पुनर्वसन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुनर्वसित गावांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी पुनर्वसन विभागाच्या दुर्लक्षितपणामुळे अद्यापही निधी उपलब्ध करुन दिलेला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुनर्वसित गावातील विकास कामांचा प्रस्ताव अनेक वर्षापासून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येलदरी व सिध्देश्वर धरणाच्या उभारणीत पुनर्वसित झालेल्या गावातील विकास कामांना तात्काळ मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने तसेच पुनर्वसित गावाकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) येलदरी धरणामुळे १२ गावे तर सिद्धेश्वर धरणामुळे ५ अशी एकूण परभणी जिल्ह्यातील १७ गावे पुनर्वसित झाली आहेत.

(२) हे खरे नाही.

येलदरी आणि सिद्धेश्वर या धरणामुळे पुनर्वसित झालेल्या गावांना पुनर्वसन करते वेळी पेव्हर ब्लॉक व नाली, स्मशानभूमी शेड, सी.सी.रोड, दिबाबत्ती शाळा, पिण्याच्या पाण्याची सुविधा इत्यादी काही नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) शासन पत्र दि.०२ मार्च, २०२१ अन्वये सन १९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पामुळे पुनर्वसित गावठाणात देय असलेल्या व अपूर्ण असलेल्या नागरी सुविधा पुरविण्या संदर्भातील प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव शासनास तातडीने सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातील मोबाईल कंपन्यांची महानगरपालिकेकडे कोट्यवधी रुपयांची असलेली थकबाकी

**(२६) * ६२३३४ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात मोबाईल टॉवर कंपन्यांकडे महानगरपालिकेची कोट्यवधी रुपयांची थकबाकी असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेकडून नागरिकांची घरपट्टी व पाणीपट्टी थकीत असलेल्यांवर कडक कारवाई केली जात असतांना मात्र, शहरातल्या सिडको विभागात सुमारे ७५ टॉवरवर तर संपूर्ण शहरात १००० हुन अधिक मोबाईल टॉवरवर तीन कोटीहून अधिक थकबाकी असतांनाही महानगरपालिकेकडून कोणतीही कारवाई केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन थकबाकीची वसुली करुन संबंधित मोबाईल टॉवर कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय,

नाशिक महानगरपालिकेच्या मालमत्ता कराच्या अभिलेखानुसार नाशिक शहरात एकूण ४६८ मोबाईल टॉवर असून त्यांची मालमत्ता कराची एकूण मागणी रु.३५.२९ कोटी आहे. त्यापैकी दि.२२/०२/२०२३ अखेर रु.३०.७४ कोटींची थकबाकी आहे.

(२) व (३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची-ड, प्रकरण ८ (कराधान नियम) नियम ४१ नुसार, मिळकतधारक यांनी थकबाकीचा भरणा न केल्यास अदत्त रकमेवर शास्ती आकारण्यात येते.

- तरीही थकबाकी न भरल्यास नियम ४२ ते ४७ नुसार अटकावणी अधिपत्र बजाविण्यात येऊन विक्रीची कार्यपध्दती विषद केली आहे.
- त्यानुसार चालु वित्तीय वर्षात थकबाकीदार मोबाईल टॉवर कंपनी यांचेवर जप्तीचे अधिपत्र बजाविण्यात आले आहे.
- संबंधितांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिका क्र.३३६७/२०१७ प्रकरणी, मोबाईल टॉवर अथवा त्यामधील विद्युत उपकरणे नाशिक महानगरपालिकेस सिल करावयाचा अधिकार नसल्याबाबत मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे.
- सदर निर्णयानुसार सिल करण्यात आलेले सर्व मोबाईल टॉवरचे सिल काढण्यात आले होते.
- तसेच, भारत संचार निगम लि. यांनी नाशिक शहरात उभारणी केलेल्या मोबाईल टॉवरवरील कर निर्धारणाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.७१३४/२००६ दाखल केली आहे. सदर याचिकेत मालमत्ता कर वसूल करण्यास मा.न्यायालयाने मनाई हुकूम दिलेला असून तो आजपर्यंत लागु आहे.
- नाशिक महानगरपालिकेने खाजगी जागेत उभारणी केलेले विविध कंपन्यांचे मोबाईल टॉवर नियमितीकरण करणे, मालमत्ता कर लागु करणे याकरिता खाजगी एजन्सीची नियुक्ती केली असून, सदर एजन्सीमार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबईतील मालाड (पश्चिम) येथील मढ-बार मार्वे भागात खारफुटीच्या जमिनीवर अवैध बांधकाम केल्याबाबत

**(२७) * ६३०१५ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड (पश्चिम) येथील मढ-बार मार्वे या भागात खारफुटीच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात भराव टाकला जात असून त्या जागेवर अवैध झोपड्यांचे बांधकाम करण्यात येत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील बहुतांश जागा जिल्हाधिकारी, वन विभाग व म्हाडाची असूनही त्यांच्याकडून या संदर्भात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भराव टाकण्याच्या कामामुळे मार्वे भागातील रस्त्यांची दूरवस्था होवून वाहतूक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यसानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे एरंगळ ता.बोरीवली येथील स.नं.५१ पै., न.भू.क्र. १४७६ ते १४७९ व १४८१ ते १४८८ मढ मार्वे रोड, अमन हॉटेल, मालाड (प) येथील खाजगी मिळकत असून सदर मिळकतीवर माहे एप्रिल, २०२२ मध्ये कांदळवनालगत बफर झोनमध्ये भरणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मालाड मार्वे भागातील रस्त्यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिरक्षण विभागामार्फत नियमितपणे पाहणी करण्यात येते व त्यानुसार निदर्शनास आलेल्या खड्ड्यांची वेळोवेळी डागडुजी करण्यात येते तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रस्त्यांची बांधकामे हाती घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** | **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** | **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.